MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता

**Special Issue 2022**

**Date of Publication
13 August 2022**

**Guest Editors**

**Dr. M. N. Kolpuke,**
Principal,
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga, Dist. Latur

**Dr. D. S. Choudhari,**
Coordinator,
Internal Quality Assurance Cell,
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga, Dist. Latur.

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

42) नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षणा समोरील आव्हाने
**प्रो.डॉ.एम.डी.कच्छवे, जि.परभणी** ||162

43) नवीन शैक्षणिक धोरण आणि स्त्री शिक्षणासमोरील आव्हानांचा अभ्यास
**डॉ. रजनी अ. बोरोळे, जि. लातूर** ||166

44) उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक कल
**कौशल्या चांगुजी खिल्लारे, औरंगाबाद** ||170

45) राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० — एक दृष्टिक्षेप
**डॉ. आनंद मुसळे, जि.लातूर** ||173

46) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० समोरील आव्हाने व संधी
**प्रा.डॉ. धालगडे अरुण बळीराम, जिल्हा लातूर** ||178

47) भारतीय उच्च शिक्षणातील वास्तव व समस्या
**प्रा.डॉ. व्ही. पी. सांडूर, जि. लातूर** ||181

48) नवीन शैक्षणिक धोरण :एक सैद्धांतिक मूल्यमापन
**डॉ. प्रा. प्रमोद जी. शिंदे, लातूर** ||186

49) नवीन शैक्षणिक धोरण आणि संशोधनातील संधी
**डॉ. शिवराज पाटील, शिरूर ताजबंद** ||189

50) नवीन शैक्षणिक धोरणाचे टप्पे : एक अध्ययन
**डॉ. एस. पी. घायाळ, शिरूर ताजबंद** ||192

51) शिक्षणातील गळतीचे प्रमाण रोखण्यातील समस्या व उपाययोजना
**बदनाळे शिवरूद्र शरणप्पा, अंकुर तानाजीराव पाटील** ||196

52) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण — २०२० : अमंलबजावणीतील पूर्व अटी
**डॉ. हरनावळे सी. के., नांदेड** ||199

53) उच्च शिक्षणातील विचार प्रवाह : दिशा व दृष्टी
**प्रा.डॉ. शंकरानंद येडले, लातूर** ||204

54) नविन शैक्षणिक धोरण २०२०
**प्रा.डॉ.बी.आर.शिंदे, जि.परभणी** ||212

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

अंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम उपयुक्त ठरू शकते.

३. प्राथमिक, माध्यमिक, पदवी, पदव्युत्तर, व्यवसायिक शिक्षण असे टप्पे दिले आहेत.

४. ६ ते १४ वर्ष या वयोगटातील शिक्षण अनिवार्य आहे.

५. प्राथमिक शिक्षणामध्ये संस्कार, क्रीडा, संस्कृती, सामाजिक भान, देशाप्रति प्रेम या सर्व उच्चतम मानवी मूल्यांचा अंतर्भाव करणे हे नवीन शैक्षणिक धोरणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

६. पूर्व प्राथमिक शिक्षण हे प्राथमिक शिक्षणाच्या परिघात येत नसल्यामुळे त्याबाबत विशेष तरतूद करणे आवश्यक आहे.

७. शिक्षण हा केंद्र व राज्य या दोन्हीच्या संयुक्त सूचीतील विषय आहे.

८. प्राथमिक शिक्षण प्रामुख्याने मातृभाषेतून देण्यात यावे अशी तरतूद नवीन शैक्षणिक धोरणात करण्यात आली आहे.

वरीलप्रमाणे येऊ घातलेल्या नवीन शैक्षणिक धोरणाच्या महत्त्वाच्या टप्प्यांचा विचार करता येईल. २०२० साली कस्तुरीरंगन समितीने दिलेल्या अहवालाचा तत्कालीन केंद्र सरकारने स्वीकार केला असून त्याच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने प्रयत्न करणे चालू आहे. आपला देश बहुभाषिक, बहुधर्मीय, बहुसंस्कृतीने नटलेला असल्यामुळे आंतरविद्याशाखीय आणि बहुविद्याशाखी अध्ययन पद्धती येत्या काळात निश्चितच देशाला विकासाच्या मार्गावर घेऊन जाणारी ठरेल यात शंका नाही.

**संदर्भ सूची —**

१. https://www.evivek.com

२. अमृतमंथन : भारतीय स्वातंर्त्याची ७५ वर्ष — संपादक डॉ. भुजंग पाटील — गुरुमाऊली प्रकाशन, उदगीर — प्रथम आवृत्ती २६ जानेवारी २०२२ — पृ. १६१

३. https://www.evivek.com

⌘⌘⌘

51

# शिक्षणातील गळतीचे प्रमाण रोखण्यातील समस्या व उपाययोजना

**बदनाळे शिवरूद्र शरणप्पा**
सहा.प्राध्यापक (राज्यशास्त्र विभाग),
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

**अंकुर तानाजीराव पाटील**
संशोधक विद्यार्थी

***********

शैक्षणिक गळती हा आपल्या देशातील एक खूप जूना आणि तितकाच चिंतनशील विषय आहे शैक्षणिक गळती हा विषय शिक्षण विभागासमोर एक कायम आव्हान निर्माण करणारा आहे.

शैक्षणिक गळतीचे कारण काही प्रमाणात पारंपारिक आणि शिक्षण विभागाच्या चुकीच्या धोरणामुळे निर्माण झाली आहेत. यात दोषी पालक, थोडया प्रमाणात मूले आणि शिक्षण विभाग, हे सर्व घटक सुध्दा जबाबदार आहेत. त्यामुळे अनेक समस्याप्रमाणे या विषयावर स्वतंर्त्यरीत्या चिंतन झालेल दिसत नाही शिक्षणातील गळतीचे कारणे वरकरणी दिसणारी साधी, सोपी वाटतात तर काही कारणे आत दडून बसलेली असतात त्या सर्व कारणाचा समस्याचा शोध घेऊन त्याचा चिंतनशील अभ्यास करावा लागतो ती शोधून काढल्याशिवाय उपायाची वाट सापडणार नाही शैक्षणिक गळती ही अशाच प्रकारची एक समस्या आहे.

आपल्या देशात सुमारे सहा कोटीच्या वर मुले शाळे बाहेर आहेत शाळेत जाणाऱ्या मुलांची सरासरी ९५ टक्के असली तरी ४४ टक्के मुले १० वी पर्यत पोहचतात ही शिक्षण गळतीच्या समस्याची वस्तुस्थिआती आहे.

कुंटूबाची शिक्षणदेण्यसाठीची आर्थिक परिस्थिळती नसणे शाळा आणि निवास (किंवा राहण्याचे

ठिकाण) यात अंतर खूप असणे, शिक्षणाविषयी मुलांच्या मनात भिती असणे, किंवा कुंटूबात साक्षरता नसणे, शिक्षणाविषयी आवड मुलांमध्ये नसणे ही जी शैक्षणिक गळतीची कारणे सांगितली जातात. ती सार्वत्रिक नाही काही प्रमाणात ती लागू होतील परंतू याच कारणामुळे सगळीकडील मुले शाळा सोडतात हा दावा ग्राहय धरता येणार नाही या समस्येच्या मुळाशी सार्वत्रिक कारणे काय आहेत यांचा विचार केला तरच या समस्येवर काही प्रमाणात बदल व उपाययोजना करता येईल पालकांनी आपल्या मुलांना शिक्षणानी काय उपयोग होतो. योग्य आणि अयोग्य बाजूनी शिक्षणाचे महत्व पटवून दयावे शिक्षण भावी आयूष्य सुखी व समाधानी कशी फायदयाची ठरते हे पालकांनी व शिक्षकांनी मुलांना व्यवस्थित रीतीने पटवून दिले तर शाळेपासून दूर जाणाऱ्या मुलांची संख्या निश्चि तच कमी होईल.

शिक्षण हे व्यक्तीमत्व विकासाचे चारित्र्य निर्मितीचे समाजपरिवर्तनाचे साधन आहे. हा विचार भारतातल्या आपल्या थोर महापुरूषांनी आपल्याला दिलेला आहे. शिक्षण हे प्रत्येकाला सन्मानाने जगण्यासाठी मदत करत असते. शिक्षणाने सामाजिक, आर्थिक,राजकीय, शैक्षणिक, क्षेत्रात मोठया प्रमाणात बदल होतात आणि त्याचा फायदा लोकशाही बळकट होण्यासाठी होतो.

आधुनिक बदल लक्षात न घेता तशीच चालू असलेली शेकडो वर्षांची अध्यापन पध्दती, शिक्षकांना योग्य प्रशिक्षण नसणे शाळेमध्ये पायाभूत सूविधा नसणे अशी सर्व कारणे शैक्षणिक गळतीला जबाबदार ठरतात शिक्षणातील गळतीचे प्रमाण रोखणे आव्हान आणि

**समस्या : —**

शिक्षण हा केंद्र व राज्य या दोन्हीच्या संयुक्त सूचीतील विषय आहे. त्यामुळे केवळ केंद्राने धोरण घोषित करून त्याची आंमलबजावणी होणार नाही प्रत्येक राज्य सरकारने आपापल्या राज्यात हे नविन शैक्षणिक धोरण लागू करण्यासाठी योग्य ते कायदे पारित करून त्याची राज्यात प्रभावी आंमलबजावणी झाली पाहिजे. शिक्षण खात्यामध्ये सुध्दा बदल झाले पाहिजेत उदा: आज शिक्षण खात्यामध्ये शालेय विभाग उच्च शिक्षण विभाग व तंत्रशिक्षण विभाग असे प्रमूख विभाग आहेत. त्याऐवजी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व उच्च शिक्षण असे वेगळे विभाग करावे लागतील या नवीन व्यवस्थेत अनुकूल असे बदल सर्व शाळा— महाविद्यालयात व शिक्षण विभागतही करावे लागणार आहेत. बालवाडया, आंगणवाडया अशा स्वरूपात छोटया मोठया गल्लीबोळात देखील पूर्व प्राथमिक शिक्षणाचे वर्ग चालतात ते सर्व वर्ग बंद करून शाळांना जोडणी करावी लागेल.

पूर्वप्राथमिक वर्गासाठी खेळणी, मोकळी जागा, उद्याने उपलब्ध करून देणे प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध करून देणे हा तातडीचा विषय करावा लागणार आहे. विशेषत: पूर्वप्राथमीक वर्गात शिकविणाऱ्या शिक्षकांचे प्रशिक्षण हा खूप महत्वाचा विषय आहे. प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतच दिले पाहिजे अशी नवीन शैक्षणिक धोरणात स्पष्टर दिशा दिली आहे. आज संपूर्ण देश भरात फार मोठया संख्येने इंग्लिश मांध्यमाच्या पूर्वप्राथमिक व प्राथमिक शाळा आस्तिवत्वात आहेत निश्चिवतच इंग्लिश ही या सर्व मुलांची मातृभाषा नाही. त्यामुळे या शाळांचे भवितव्य काय असेल ? आज मराठी शाळेत शिकणाऱ्या एखादया मुलांची मातृभाषा कन्नड, गुजराती, तामिळ असेल तर त्याच्या शिक्षणाची पर्यायी व्यवस्था काय करता येईल यांचे स्पष्ट निर्देश नवीन शैक्षणिक धोरणात नाहीत यासंबंधी आधिक तपशीलात चर्चा होण्याची आवश्यकता आहे. एखादया विषयात विद्यार्थी नापास झाला तर त्याला नापास न करता इतर विषयांच्या प्रगतीचा आढावा घेऊन त्याला वरच्या वर्गात प्रवेश घ्यावा अशी तरतुद नवीन शैक्षणीक धोरणात आहे. कला, क्रिडा, यासाठी तज्ञ शिक्षकांची नियुक्ती संस्थाना करावी लागेल प्रत्येक शाळेला या विशेष विषयाचे शिक्षक उपलब्ध होतील असे नाही. पण जवळच्या शाळांचे असे शिक्षण संकुल तयार करून त्या संकुलातील सर्व शाळांना या विशेष विषयाचे शिक्षक उपलब्ध होतील अशी व्यवस्था केली पाहिजे.

विदयार्थाची गळती हा विषय नवीन शैक्षणीक धोरणात खूप गांभीर्यानी विचारात घेतला आहे. त्या, त्या शैक्षणीक संकुलाच्या परिसरात गळती झालेल्या विदयार्थाची भरती पुन्हा कशा पध्दतीने करता येईल यांची सविस्तर चर्चा केली गेली आहे. परंतु या विषयात

शिक्षण संस्थाचा सहभाग किती व शासनाचा सहभाग किती यांचे स्पष्ट कारण आवश्यक आहे.नवीन शैक्षणीक धोरण आतिश्य अश्वा सक आहे. लवचीक आहे. पूर्वीच्या धोरणातील अनेक त्रुटी लक्षात घेऊन त्या दुरूस्त करण्याचा प्रयत्न या धोरणात केलेला आहे. पण अजून प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना अनेक समस्या समोर दिसत आहेत. पालक शिक्षक संस्थाचालक व शासन यांच्या समन्वयातून या समस्यावर उत्तर मिळेल व त्यातून नवीन पिढीला अधिक प्रभावी कार्यक्षम शिक्षण देता येईल.

आतापर्यतचे शिक्षण अथवा शिक्षणक्रम पूर्णपणे पाश्चालत्य जीवन दर्शनावर आधारित होते त्याऐवजी भारतीय संस्कृती व परंपरा हा नवीन शिक्षणक्रमाचा व पुर्नरचनेचा पाया असेल या नवीन शैक्षणिक धोरणाच्या आंमलबजावणीत समाजात अजून पुष्कळ गोंधळ आहे. हा गोंधळ दूर करण्यासाठी शाळा व्यवस्थापन, शिक्षकवृंद, प्रसारमाध्यमे महाविद्यालयाचे पदाधिकारी यांनी नवीन शैक्षणिक धोरण कसे उपयोगी आणि महत्वाचे आहे हे पटवून सांगितले पाहिजे त्यानंतर लोकप्रतिनीधी मार्फत सर्व स्तरापर्यंत हे बदल पोहचविण्याचा प्रयत्न करता येईल.

**शिक्षणातील गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी उपाययोजना : —**

शाळा सोडलेल्या विद्यार्थांना पून्हा शाळेत आणण्यासाठी व आणखी विद्यार्थ्यांना शाळा सोडण्यापासून रोखण्यासाठी एकूण दोन उपक्रम हाती घेण्यात येतील पहिला म्हणजे, प्रभावी आणि पुरेशा पायाभूत सुविधा पूरवणे जेणेकरून सर्व विद्यार्थांना पूर्व प्राथमिक शाळा ते इयत्ता १२ वी पर्यंतच्या सर्व स्तरावर सुरक्षित आणि रंजकपणे शालेय शिक्षण मिळू शिकेल प्रत्येक टप्प्यावर नियमीत प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध करून देण्या बरोबरच कोणत्याही शाळेत पायाभूत सुविधाची कमतरता राहणार नाही यांची विशेष काळजी घेतली जाईल सरकारी शाळांची विश्विसार्हता पूर्नप्रस्थापित केली जाईल आणि अधिपासून अस्तीत्वात असलेल्या शाळांची गूणवत्तावाढ विस्तार करून जिथे शाळा अस्तित्वात नाहीत अशा ठिकाणी अतिरिक्त दर्जेदार शाळा बांधून आणि सुरक्षीत व व्यवहार्य वाहतूक सुविधा आणि/किंवा वस्तीगृहे पुरवून विशेषत: मुलींसठी हे साध्य केले जाईल जेणेकरून सर्व मुलांना गूणवत्तापूर्ण शाळेत जाण्याची आणि योग्य स्तरावर शिकण्याची संधी मिळेल स्थलांतरीत मजुराची मुले, आणि विविध परिस्थितीमुळे शाळा सोडणाऱ्या इतर मुलांना शिक्षणाच्या मूख्य प्रवाहात परत आणण्यासाठी नागरीकांच्या सहकार्याने पर्यायी आणि नाविन्यपूर्ण शिक्षणाची केंद्रे स्थापन केली जातील.

दुसरा उपक्रम म्हणजे विद्यार्थ्यांवर तसेच त्याच्या शिक्षण पातळीवर काळजीपूर्वक लक्ष ठेवून शाळेत सार्वत्रीक सहभाग साध्य करणे जेणेकरून त्यांनी शाळेत प्रवेश घेतला आहे. व उपस्थित आहेत आणि ते मागे पडले असल्यास किंवा त्यांनी शाळा सोडली असल्यास पुन्हा अभ्यास भरून काढण्यासाठी आणि शाळेत पुन्हा प्रवेश घेण्यासाठी त्याना योग्य संधी मिळतील हे सुनिश्चिठत केले जाईल.

मुलांनी शाळेत प्रवेश घेतला आहे. आणि ती शाळेत उपस्थित राहत आहेत हे सुनिश्ति करणे हे शालेय व्यवस्थेचे उदिष्ट असणे आवश्यक आहे. सम्रग शिक्षा अभियान आणि शिक्षण हक्क कायदा यासारख्या प्रयत्नाच्या माध्यमातून भारताने अलिकडच्या काही वर्षात प्राथमिक शिक्षणात जवळपास पूर्णपणे म्हणता येईल अशी शाळा नोंदणी साध्य करण्याच्या दृष्टीने उल्लेखनीय प्रगती केली आहे नंतरच्या इयत्ताचा डेटा मात्र मुलांना शालेय शिक्षण व्यवस्थेत (संभाळून ठेवण्यात) काही गंभीर समस्या असल्याचे दर्शवतो NSSO ते २०१७—२०१८ मध्ये केलेल्या ७५ व्या फेरीतील घरगुती सर्वेक्षणानूसार ६ ते १७ वयोगटातील शाळाबाहय मूलांची संख्या ३.२२ कोटी आहे. या मूलांना लवकरात लवकर शिक्षणप्रवाहात आणणे आणि २०३० पर्यत शालापूर्व ते माध्यमिक स्तरापर्यंत १००% एकुण शाळा नोदणी गूणोत्तरांचे उदिष्ट ठेवून आणखीन मूलांची शाळा गळती थांबवणे याना सर्वेच्च प्राधन्य असेल

देशातील सर्व मूलांना शाळापूर्व ते इयत्ता १२ वी पर्यंतच्या, व्यावसायिक शिक्षणासह गूणवत्तापूर्ण सर्वागीण शिक्षणाची सर्वत्रिक उपलब्धतता सुनिशति करण्यासाठी आणि तशी संधी देण्यासाठी सार्वसमावेशक